लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष व सदस्य यांच्या निवडीसाठी निवड समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.:- एलपीएल -२०२६/प्र.क्र.३/लोकआ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०२६

वाचा :- १. महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ दि.०८.१२.२०२५.
२. महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५ दि.२६.१२.२०२५

**प्रस्तावना :-**

लोकपाल व लोक आयुक्त अधिनियम, २०१३ च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यासाठी नवीन कायदा अधिनियमित करण्यासाठी तसेच महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ ची व्याप्ती वाढवून लोक आयुक्तास अधिक अधिकार सोपविण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ प्रसिद्ध केला आहे. सदरचा अधिनियम राज्यात लागू होण्यापूर्वी लोक आयुक्त संस्थेची स्थापना करणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम प्रसिद्ध करुन महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियमातील (मुख्य अधिनियम) कलम १, ३ व ४ ही कलमे अंमलात आणली आहेत. त्यास अनुसरुन मुख्य अधिनियमातील कलम ४ च्या अनुषंगाने लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष व ४ सदस्य (२ न्यायिक व २ अन्य सदस्य) यांच्या निवडीकरीता निवड समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम ४ (१) नुसार लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीकरीता खालील व्यक्तींचा समावेश असणारी निवड समिती गठित करण्यात येत आहे:-

**निवडसमिती**

| अ.क्र. | निवड समितीमधील व्यक्ती | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २. | उप मुख्यमंत्री | उपाध्यक्ष |
| ३ | महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती | सदस्य |
| ४ | महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्र विधानपरिषदेमधील विरोधी पक्ष नेता | सदस्य |
| ६ | महाराष्ट्र विधानसभेमधील विरोधी पक्ष नेता | सदस्य |
| ७ | मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश | सदस्य |

**२.** महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ मधील कलम ४ (२) नुसार निवड समितीमधील कोणतेही पद रिक्त आहे केवळ या कारणावरुन अध्यक्षाची किंवा सदस्याची नियुक्ती विधीअग्राह्य ठरणार नाही. तसेच महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ मधील कलम ४ (३) नुसार निवड समिती, लोक आयुक्ताच्या अध्यक्षाची व सदस्यांची निवड करण्यासाठी तिची स्वत:ची कार्यपद्धती नियमित करील, जी पारदर्शक असेल.

**३.** सदर शासन निर्णय सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२७१५४३३८४७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D5368 2C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE5754 8776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.02.27 15:44:41 +05'30'

**( निता शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. मा.मुख्य न्यायाधीश / त्यांनी नामनिर्देशित केलेले मा.न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
९. निवड नस्ती.